


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २२३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२६ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# ‘अशोक खरातचे अनेक कांड बाहेर येत आहेत’, देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत माहिती

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुन्हा एकदा विधानसभेत भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावर भूमिका मांडली. विकृत भोंदूबाबा अशोक खरात याच्या प्रकरणी काल मी सविस्तर निवेदन दिलं आहे. मी सर्वांना विनंती करेन की, ज्यांच्याकडे या प्रकरणाची माहिती आली असेल तर ती माहिती शासनापर्यंत पोहोचवावी.

कारण या प्रकरणाची संपूर्ण माहिती मिळवून त्या व्यक्तीला अशी शिक्षा द्यायची आहे की, अशा पद्धतीने वागणारे लोकं आहेत त्यांना जरब बसली पाहिजे. या प्रकरणाने आपण नेमके कुठे जात आहोत? असा विचार करण्याची वेळ आली आहे, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

आपण नेहमी असं म्हणतो की, आत्मविश्वास असावा पण अतिआत्मविश्वास असू नये. तसेच आपण सर्व श्रद्धा मानणारे लोकं आहोत. पण श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यामध्ये खूप छोटी रेघ आहे. ती रेघ ओलांडली जाते तेव्हा काय होतं ते आपण या प्रकरणातून बघितलं आहे. पण एकप्रकारे अंधश्रद्धेत विवेक हरवतो ते आपल्याला या प्रकरणात बघायला मिळालं आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

आपला महाराष्ट्र संत ज्ञानेश्वर माऊली, जगद्गुरु संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत सावता माळी, संत नरहरी सोनार, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा, संत गुलाबराव महाराज, संत गाडगेबाबा, संत सेवालाल महाराज अशी एक थोर परंपरा असलेला आपला महाराष्ट्र आहे. यांच्यापैकी कुणीही देवाचं अस्तित्व नाकारलेलं नाही. पण या सगळ्यांनी अंधश्रद्धेवर प्रहार केले आहेत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

ज्ञानेश्वर माऊलींनी धर्म आणि श्रद्धेचा मार्ग पसायदानातून सांगितला. दुरितांचे तिमिर जावो विश्व स्वधर्म सूर्य पाहो, त्यांनी दुष्ट प्रवृत्तींवर प्रहार केला आहे.

अंधश्रद्धा, अंधार, अज्ञान हा सगळा नाहीसा झाला पाहिजे आणि जग ज्ञानरुपी प्रकाशमय झालं पाहिजे, अशी प्रकारची भावना आणि कामना त्यांनी जगाकरता केली आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात,जे का रंजले गांजले, त्यासि म्हणे जो आपुलें, तोचि साधू ओळखावा, देव तेथेंचि जाणावा, अशा पद्धतीने संत तुकाराम महाराजांनी सांगितलं आहे. त्यामुळे देवत्व कुठे बघितलं पाहिजे? याचा विचार करण्याची वेळ आली आहे, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी मांडली.

**‘जादूटोणा विरोधी कायद्याचे नियम लवकरच लागू होणार’**

जादूटोणा विरोधी कायद्याचे नियम झाले नाहीत असा मुद्दा चर्चेत आला.



हे खरंच आहे. त्याची माहिती घेतली असता, त्याचे नियम अंतिम टप्प्यात आहेत. कायदा आणि प्रशासनाने त्यांना मान्यता दिलेली आहे. पण ते नियम नसले तरी सेक्शन ३ असल्याने नियमांचा अडसर येत नाही. या कायद्याची अंमलबजावणी आपण ताकदीने केली आहे. या प्रकरणातही आपण कायद्याची अंमलबजावणी केली आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**मुख्यमंत्र्यांचं जादूटोण्यावर उपरोधिक भाष्य...**

जादूटोणा करुन समस्या संपल्या असता तर या भोंदू खरातला अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा सुरक्षा सल्लागार नेमला असता. म्हणजे सगळेच विषय संपले असते. युद्ध आपण ड्रोन ऐवजी लिंबू मिरचीने लढलो असतो. पाकिस्तानच्या दहशतवाद्यांना आपण इथे बसूनच टाचण्यांनी संपवलं असतं. सीमेवर सैनिक पाठवण्याची आवश्यकता पडली नसती. पाच-दहा भोंदू बाबा पाठवले असते. आपल्याला प्रचारसभाच घ्याव्या लागल्या नसत्या. एका ठिकाणी बसून निवडणुका जिंकता आल्या असत्या, असं देवेंद्र फडणवीस उपरोधिकपणे म्हणाले.

आपण ज्याला अध्यात्म म्हणतो, सकारात्मकता, प्रामाणिकता आणि कुणाचं नुकसान होत नाही ही खरी श्रद्धा आहे. ज्यात दुसऱ्याच अहित होतं ती खरी श्रद्धा असू शकत नाही. ती अंधक्षद्धा आहे. त्या विरुद्ध मोठ्या कडक पद्धतीने राज्य सरकार कारवाई करेल. अशोक खरातचे अनेक कांड बाहेर येत आहेत, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

# प्लॉट विक्रीच्या वादातून संसाराची राखरांगोळी, संतापात नवऱ्याला संपवलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, छ. संभाजीनगर :** एका जमिनीच्या प्लॉटचा व्यवहार कुटुंबासाठी इतका महागात पडेल, अशी कल्पनाही कोणी केली नसेल. छत्रपती संभाजीनगरमधील सिल्लोड तालुक्यातील घटनांद्रा येथे संसाराची राखरांगोळी करणारी एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. घरचा प्लॉट विकण्यावरून झालेल्या वादातून पत्नीने रागाच्या भरात आपल्याच पतीचा भीषण अंत केला. या कृत्यापूर्वी आरोपी पत्नीने पतीच्या डोळ्यात मिरचीची पूड फेकून त्यांना असहाय्य केलं आणि त्यानंतर जड वस्तूने प्रहार करून गळा आवळून त्यांचा जीव घेतला.

**प्लॉट विक्रीस पत्नीचा विरोध**

जेबास तालीब पठाण (वय ४६) असं हत्या झालेल्या पतीचं नाव आहे. तर रशिदाबी जेबास पठाण (रा. घटनांद्रा) असं आरोपी पत्नीचं नाव आहे. याप्रकरणी अधिक माहिती अशी की, मृत जेबास पठाण हे गेल्या अनेक वर्षांपासून स्टोव्ह, गॅस आणि मिक्सर दुरुस्तीचा छोटा व्यवसाय करून आपल्या



कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. मोठ्या कष्टाने आणि पै-पै वाचवून त्यांनी घटनांद्रा गावात एक प्लॉट खरेदी केला होता. घरच्या काही गरजा पूर्ण करण्यासाठी जेबास यांना हा प्लॉट विकायचा होता, मात्र त्यांची पत्नी रशिदाबी हिचा या विक्रीला टोकाचा विरोध होता. गेल्या काही दिवसांपासून या विषयावरून पती-पत्नीमध्ये सतत कटकटी सुरू होत्या.

**मारण्याधी डोळ्यात मिरचीची पूड**

सोमवारी २३ मार्च रोजी रात्री जेबास कामावरून घरी परतल्यानंतर पुन्हा एकदा प्लॉटच्या विक्रीचा विषय निघाला. यावेळी दोघांमधील वाद इतका विकोपाला गेला की, रशिदाबीने संतापाच्या भरात घरातील तिखट मिरचीची पूड जेबास यांच्या डोळ्यात फेकली. काही समजण्यापूर्वीच तिने त्यांच्या डोक्यावर पाठीमागून जोरदार प्रहार केला. जेबास जखमी होऊन जमिनीवर कोसळताच रशिदाबीने त्यांचा गळा आवळून निर्घृण हत्या केली. हा सर्व प्रकार मध्यरात्रीच्या सुमारास घडला असून पहाटे ही घटना उघडकीस आली.

**पुतण्याच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल**

या प्रकरणाची माहिती मिळताच सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृत जेबास यांचा पुतण्या रिजवान सांडू पठाण याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी रशिदाबी पठाणविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून तिला ताब्यात घेतलं आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश कोल्हे आणि पोलीस निरीक्षक रवींद्र ठाकरे या घटनेचा अधिक तपास करत आहेत. या भीषण हत्याकांडात अन्य कोणाची चिथावणी किंवा सहभाग आहे का, याचाही शोध पोलीस घेत आहेत.

# अक्षराजच्या बातमीचा इम्पॅक्ट!

## मनसेच्या मागणीची प्रशासनाकडून तात्काळ दखल

**अक्षराज : रविंद्र खाडे**



**दि.२५, शहापूर (ठाणे) :** वेहलोळी ते ढाढरे मार्गावरील निकृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या कामाबाबत मनसेने घेतलेल्या आक्रमक भूमिकेला अखेर यश आले आहे. अक्षराज या वृत्तपत्राची बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर व मनसेच्या निवेदनाची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ हालचाल करत प्रत्यक्ष स्थळी पाहणी केली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहापूर तालुका उपाध्यक्ष दिनेश भास्कर वेखंडे यांनी केलेल्या तक्रारीनंतर आणि ‘अक्षराज’च्या वृत्तामुळे प्रशासन सतर्क झाले. सार्वजनिक बांधकाम विभाग, शहापूर क्र.१ चे अभियंता दिपक ठाकूर यांनी संबंधित रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करून ठेकेदारांना दर्जेदार काम करण्याच्या सक्त सूचना दिल्या.

यावेळी कामाच्या गुणवत्तेबाबत विशेष लक्ष देण्याचे आदेश देण्यात आले असून, तांत्रिक निकषांचे काटेकोर पालन करण्यास सांगण्यात आले आहे.

यानंतर रस्त्याचे काम योग्य पद्धतीने सुरू झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. मनसेच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाने तातडीने घेतलेली ही कारवाई नागरिकांसाठी दिलासादायक ठरली आहे. स्थानिक नागरिकांनीही या निर्णयाचे स्वागत करत दर्जेदार रस्त्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

दरम्यान, पुढील काळातही कामाची गुणवत्ता कायम राखली जावी, अन्यथा पुन्हा आंदोलन छेडले जाईल, असा इशारा मनसेकडून देण्यात आला आहे.

# पोंभूर्णा येथे फिश मार्केट व नाट्यगृहावर सोलर पॅनलसाठी ३२.६८ लाखांच्या कामांना प्रशासकीय मान्यता

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून पोंभूर्णा शहरातील फिश व मटन मार्केट तसेच खुले नाट्यगृह येथे सोलर पॅनल बसविण्यासाठी ३२ लक्ष ६८ हजार रुपये कामांना जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. ऊर्जा स्वावलंबनाचा आदर्श निर्माण करण्याच्या दृष्टीने आ. मुनगंटीवार सातत्याने कार्यरत असून, यापूर्वी उथळपेठ गावाला १०० टक्के सौरग्राम म्हणून विकसित करण्यास त्यांनी पुढाकार घेतला. त्यानंतर चिंतलधाबा गावासाठीही सौरग्राम प्रकल्पांतर्गत १ कोटी ५६ लाख रुपयांचा निधी मंजूर करून त्यांनी ऊर्जा क्षेत्रात भरीव कामगिरी साधली.

आता पोंभूर्णा शहरातील फिश मार्केट व नाट्यगृहावर सोलर पॅनल उभारणीस मंजुरी मिळवून देत त्यांनी स्वच्छ, शाश्वत व किफायतशीर ऊर्जेचा वापर वाढविण्याचा दूरदृष्टीपूर्ण दृष्टिकोन पुन्हा अधोरेखित केला आहे. या उपक्रमामुळे वीजबिलात बचत होणार असून पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळणार आहे. त्यामुळे पोंभूर्णा तालुका ऊर्जा स्वावलंबनाकडे वाटचाल करणारा आदर्श ठरत आहे.

सदर कामांसाठी निधी उपलब्ध झाल्याने लवकरच प्रत्यक्ष अंमलबजावणीस प्रारंभ होणार आहे. या प्रकल्पामुळे सार्वजनिक ठिकाणांवरील वीज खर्चात लक्षणीय बचत होईल, तसेच हरित ऊर्जेचा वापर वाढीस लागेल. परिणामी पर्यावरण संवर्धनाला हातभार लागून पोंभूर्णा शहर शाश्वत विकासाच्या दिशेने ठोस पाऊल टाकणार आहे.

**पोंभूर्णा तालुक्याचा सर्वांगीण विकास...**

पोंभूर्णा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पुढाकार घेत अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प साकारले आहेत. त्यांच्या प्रयत्नांतून फिश मार्केट व खुले नाट्यगृहाची उभारणी, ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर, नगरपंचायतची भव्य इमारत, विश्रामगृह, श्री राजराजेश्वर मंदिराचे सौंदर्यीकरण, छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिकृती, माळी समाजासाठी सभागृह, आदिवासी वसतिगृह, वीर बाबूराव शेडमाके सभागृह, पत्रकार भवन, जिम तसेच पंचायत समिती व तहसील कार्यालयाच्या इमारती अशा विविध कामांमुळे तालुक्याचा चेहरामोहरा बदलला आहे.ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि सांस्कृतिक विकास यांचा समतोल साधत पोंभूर्णा तालुका प्रगतीच्या नव्या टप्प्याकडे वाटचाल करत असल्याचे या उपक्रमांतून स्पष्ट होते.

# निफाड तालुक्यात जलद कालव्यात पडून मजुराचा मृत्यू
## पेठ तालुक्यातील कामगारावर काळाचा घाला

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२५, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील देवगाव परिसरात एका द्राक्ष बागेत कामासाठी आलेल्या मजुराचा गोदावरी जलद कालव्यात पडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सोमनाथ लक्ष्मण बोके (वय ५१, रा. अंबापूर, ता. पेठ) असे मृत व्यक्तीचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, सोमनाथ बोके हे देवगाव भागात द्राक्ष बागेच्या कामासाठी आले होते. शनिवारी, २१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६:३० वाजेच्या सुमारास ते गोदावरी जलद कालव्याजवळ गेले असता, त्यांचा पाय घसरून ते पाण्यात पडले आणि बेपत्ता झाले. स्थानिकांनी त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने ते मिळून आले नाहीत.

**दोन दिवसांनी आढळला मृतदेह**

सोमवार, २३ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास सदर व्यक्तीचा मृतदेह पाटाच्या पाण्यावर तरंगताना आढळून आला. देवगावचे पोलीस पाटील सुनील बोचरे यांनी तातडीने या घटनेची माहिती लासलगाव पोलीस ठाण्यात दिली.

**पोलीस कारवाई**

याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची (अ.मृ. रजिस्टर नंबर २२/२०२६) नोंद करण्यात आली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ अन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार औदुंबर मुरडनर पुढील तपास करीत आहेत.

# कोपरखैरणे येथे अनधिकृत बांधकामावर तोडक कार्यवाही

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२५, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व कैलास गायकवाड, उप आयुक्त (अतिक्रमण) यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागात कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई केली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत अरविंद बाबाजी पोटे, एस.एस. टाईप ,रूम नं ६३१,सेक्टर-८, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये दिनांक १६/०३/२०२६ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर निष्कासनाची अंशतः तोडक कार्यवाही करण्यात आली.

सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त भरत ऊधांडे, कनिष्ठ अभियंता चंद्रकांत धोत्रे व इतर अधिकारी, कर्मचारी व नमुंमपा पोलीस बंदोबस्त उपस्थित होते. तसेच सदर कारवाईसाठी मजूरांचा व पिकअप व्हॅन, इलेक्ट्रॉनिक हॅमर, गॅस कटर चा वापर करण्यात आला. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.




## परीक्षा... शाळा अन् पालकांची!

अशोक खरात या भोंदूबाबाच्या कारनाम्यांचा भांडाफोड झाल्यानंतर राज्यभरातील सामाजिक, धार्मिक अन् राजकीय क्षेत्र मागील आठवडाभर ढवळून निघाले. खरातचे पुढे येत असलेले एकसे बढकर एक 'प्रताप' पाहून अद्यापही धक्के बसत आहेत. दुर्दैवाने जनसामान्यांचाही अलीकडे अशाच विषयांत रस वाढल्याने त्यांच्यापुढील जगण्या-मरण्याचे इतर प्रश्न फिके पडत आहेत की काय, असेच वाटावे. विधिमंडळात हा विषय तापल्याने बहुधा चालू आठवड्यातही बाबाची 'पारायणे' सुरू राहाण्याची शक्यता. परंतु, नेहमीप्रमाणे या खमंग चर्चेमुळे इतर काही महत्त्वाचे विषय झाकोळले गेले. शालेय मुलांसंबंधीच्या दोन-तीन महत्त्वाच्या बातम्या त्यापैकीच.

दहावीच्या पेपरदरम्यान मासिक पाळी आलेल्या विद्यार्थिनीची पर्यवेक्षिकेने अडवणूक केल्याने या मुलीला अवघडलेल्या स्थितीत बसूनच पेपर लिहावा लागला. स्वच्छतागृहात जाण्याची परवानगी नाकारण्यात आलीच; परंतु सॅनिटरी पॅड देण्यासही टाळाटाळ करून संवेदनाशून्यतेचा कळस गाठला गेला. शेवटी गणवेशावरचे डाग लपवतच विद्यार्थिनीला घरी जावे लागले. या परीक्षार्थीसोबत महिला कर्मचाऱ्याला स्वच्छतागृहात पाठविले असते तरी भागले असते. परंतु, तेवढेही सौजन्य दाखविले गेले नाही. पर्यवेक्षिकेला नियम न मोडताही मुलीची अवस्था समजून घेता आली असती. विद्यार्थी, शिक्षक, पालक अशा सर्वच घटकांत मासिक पाळीबाबत जनजागृती आवश्यक असल्याचा मुद्दाही प्रकर्षाने समोर आला. या मुलीच्या 'केस स्टडी'ने कदाचित शिक्षण मंडळाकडून धोरण ठरविले गेल्यास इतरांची परवड थांबू शकेलही; परंतु या विद्यार्थिनीच्या मनावर खोलवर उमटलेले ओरखडे पुसले जातील? मासिक पाळीबाबतच्या न्यूनगंडातून मुली कशा बाहेर येऊ शकतील? करोनानंतरच्या काळात शैक्षणिक संस्थांसह सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात सॅनिटरी पॅड पुरविणारी मशिन्स लागली होती. राज्य सरकार आणि अनेक सेवाभावी संस्थांनी त्यासाठी वेळोवेळी स्वत:ची पाठही थोपटून घेतली. आज ही यंत्रे एकतर गायब झाली आहेत किंवा पॅडचा पुरवठा नसल्याने धूळ खात पडली आहेत.

दुसरी बातमीसुद्धा तितकीच गंभीर, पौगंडावस्थेतील मुलांची मानसिकता, त्यांच्या भावभावनांचे पदर उलगडणारी. राज्यातील काही शाळांनी केलेल्या दहावीच्या विद्यार्थ्यांच्या दप्तर तपासणीत नको त्या वस्तू आढळल्या. अर्थात, मुलांच्या बॅगांमध्ये चाकू, कोयते अशा तत्सम गोष्टी यापूर्वी सापडलेल्या आहेतच. परीक्षाकाळात मुलांच्या होणाऱ्या गंभीर हाणामाऱ्या आजही रोखता आलेल्या नाहीत. या खेपेला जरा पुढचे पाऊल पडले. रोख रकमेसह प्रेमपत्रे, नवी साडी, हिरवा चुडा, चाकू, भेटवस्तू आणि गर्भनिरोधक पाकिटे दप्तरांत आढळली, जी आणखी चिंताजनक बाब. 'झाकली मूठ सव्वा लाखा'ची या उक्तीप्रमाणे शाळेने संबंधितांच्या पालकांना पाचारण करून कर्तव्य पार पाडले. परंतु, घराघरांतील किशोरवयीन मुलांच्या वर्तनाचा कायम असलेला प्रश्न नव्याने उपस्थित झाला. कोवळ्या वयात प्रेम आणि त्यातून चुकीचे प्रसंग गुदरण्याची भीतीही आहेच. आधीच आभासी आणि भौतिक चीजवस्तूंनी त्यांचे बालपण हिरावले गेले आहे. मोबाइलसारख्या गॅझेटच्या दुष्परिणामांचा पुनरुच्चार करण्याची आवश्यकता नाही. मुले-मुली वयाच्या पुढे चालत असल्याने नवी आव्हाने उभी ठाकत आहेत, जी पालकत्वाला वरचढ ठरत आहेत.

कौटुंबिक पातळीवरील संवाद ढासळल्याने मुले कोणाचा तरी आसरा शोधतात. मग अशात संगत चुकते. 'असंगाशी संग' हे पालकांना कळत असूनही वळताना दिसत नाही. त्यांनी पुढच्या हाका सावधपणे ऐकून मुलांकडे अधिक लक्ष पुरविल्यास फरक पडू शकेल. मुलांना पुस्तकी शिक्षणासोबत जबाबदाऱ्यांचेही भान करून द्यावे लागेल. तो मूल्यशिक्षणाचा भागच म्हणावा लागेल. महिला सन्मानाच्या संस्कारांचीही रुजवण झाल्यास बरेच प्रश्न सुटू शकतील. दप्तरे वह्या-पुस्तकांऐवजी चाकू-सुऱ्यांनी भरू लागली, तर ते गांभीर्याने घ्यावेच लागेल; कारण शेवटी प्रश्न पुढच्या पिढीचा आहे.

**- संपत थेटे**

# सर्व गुणांचा राजा 'प्रभू श्रीराम'



जगभरातील कोट्यवधी हिंदूंचे आराध्य दैवत असलेल्या प्रभू श्रीरामचंद्रांची जयंती अर्थात श्रीरामनवमी म्हणजे रामभक्तांसाठी आनंदाची पर्वणी असते. जगाच्या पाठीवर रामराज्य हे सर्वार्थाने आदर्श असण्याचे गुपित श्रीरामांमध्ये असलेल्याला गुणांमध्ये आहे. आज या लेखातून आपण श्रीरामांची काही गुणवैशिष्ट्ये जाणून घेणार आहोत. उपास्य देवतेसंदर्भात उपयुक्त माहिती मिळाल्यावर त्या देवतेप्रती श्रद्धा वाढण्यास साहाय्य होते. आपलीही श्रीरामांप्रतीची श्रद्धा वाढीस लागून श्रीरामाच्या अस्तित्वाचा आपल्या सर्वांना लाभ व्हावा ही श्रीरामप्रभुंच्या चरणी प्रार्थना !

**१. आदर्श राजा :** सीतामाता, शीलक्ष्मण यांसह श्रीराम वनवासातून अयोध्येत परतल्यानंतर एका परिटाने सीतामातेविषयी संशय व्यक्त केला तेव्हा श्रीरामांनी प्रजेच्या मनात कोणत्याही प्रकारचा संभ्रम नको म्हणून तात्काळ सीतामातेचा त्याग केला. ज्या अर्धांगिनीने श्रीरामांना वनवासात साथ दिली तिचा एका परिटाच्या संशयावरून त्याग करताना श्रीरामांनी एका राजासाठी प्रजा किती महत्वाची असते हे स्वतःच्या वर्तणुकीतून दाखवून दिले. श्रीरामाने राजधर्माचे पालन केले नाही असा चुकीचा संदेश येणाऱ्या पिढीकडे जाता कामा नये यासाठी श्रीरामाने आपल्या सहचारिणीचाही त्याग केला. जनतेच्या पैशांतून आपल्या सात पिढ्या बसून खातील एवढी माया गोळा करणारे हल्लीचे राजकारणी कुठे आणि जनतेच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी प्रसंगी धर्मपत्नीचाही त्याग करणारे प्रभू श्रीराम कुठे.

**२. शत्रुवरही प्रेम करणारा :** रावणाचा वध केल्यानंतर श्रीरामाने रावणाचा बंधू विभीषणाला त्याचा अंत्यसंस्कार करण्यास सांगितले. तेव्हा विभीषणाने त्यास नकार दिला. 'मरणांती वैराणी' या वचनानुसार मृत्यूनंतर वैरही संपते त्यामुळे तू जर रावणाचा अंत्यसंस्कार करायला तयार नसशील तर मी करतो, माझाही तो बंधूच होता असे प्रभू श्रीरामचंद्रानी विभीषणला निक्षून सांगितले. अखेर विभीषण श्रीरामांच्या सांगण्यावरून रावणाचा अंत्यसंस्कार करण्यास तयार झाला. रावण महादेवाचा थोर भक्त होता. भक्तीच्या बळावर त्याने प्रचंड बळ आणि सिद्धी हस्तगत केल्या होत्या ज्याचा त्याला गर्व झाला होता. श्रीरामांनी रावणाचा वध करून केवळ त्याची भूलोकीची यात्रा संपवली नाही, तर त्याचे गर्वहरण करून त्याचा कायमचा उद्धारही केला.

**३. आदर्श पुत्र :** श्रीराम सर्वार्थाने आदर्श पुत्र होते. प्रभू श्रीरामाच्या राज्याभिषेकाची सिद्धता सुरु असतानाच सावत्र आई कैकयीने जेव्हा श्रीरामांच्या वनवासाच्या हट्ट धरला तेव्हा कोणतेही आढेवेढे न घेता श्रीरामांनी वनवासात जाण्यास तत्परतेने होकार दिला. वल्कले परिधान केली आणि वनवासात जाण्यासाठी सिद्ध झाले. वनवासाहून आल्यानंतर श्रीरामांनी कैकयी मातेचे आशीर्वाद घेतले. कोणताही पूर्वग्रह न बाळगता ते कैकयी मातेशी पूर्वीप्रमाणे प्रेमाने वागू लागले. कुठे सत्तेच्या हव्यासापोटी आपल्या रक्ताच्या नातेवाईकांशी वैराने वागणारे हल्लीचे राज्यकर्ते आणि कुठे वडिलांनी सावत्र आईला दिलेल्या वचनाच्या पूर्ततेसाठी क्षणार्धात साऱ्या वैभववर पाणी सोडणारे प्रभू श्रीराम !

**४. आदर्श बंधू :** आजही दोन भावांत प्रेमाचे नाते दिसले कि त्यांना आपण राम लक्ष्मणाची जोडी म्हणून संबोधतो. यावरून श्रीराम आणि लक्ष्मण यांमध्ये किती प्रेमाचे नाते होते हे लक्षात येते. वनवास श्रीरामांना देण्यात आला होता मात्र लक्ष्मणाने सारे वैभव सोडून श्रीरामांची साथ दिली. श्रीरामांनीही संपूर्ण वनवासकाळात लक्ष्मणाची सर्वार्थाने काळजी घेतली. बंधू वनवासात गेला असताना अयोध्येचे राज्य उपभोगायची संधी मिळाल्यावरही भरताने श्रीरामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून विश्वस्त म्हणून राज्याचा कार्यभार सांभाळला. यावरूनच श्रीरामांनी भरताला काय ताकदीचे बंधुप्रेम दिले होते याची कल्पना येते. ज्या काळात रावणाने बंधू विभीषणाला सापत्न वागणूक दिली. वालीने बंधू सुग्रीवावर अन्याय केला होता त्याकाळात आदर्श बंधूप्रेमाचा परिपाठ श्रीरामांनी घालून दिला. वडिलांच्या संपत्तीमध्ये अधिकाधिक वाटा मिळण्यासाठी एकमेकांचा जीव घेण्यास उठणाऱ्या आताच्या बंधूंनी श्रीराम लक्ष्मणाच्या नात्यातून बोध घ्यायला हवा.

**५. संघटन कुशलता :** रावणाने सीतेचे हरण केल्यानंतर श्रीविष्णूचा अवतार असलेले श्रीराम रावणाला सहजपणे पराभूत करून सीतेला घेऊन येऊ शकले असते. एका हाताने शिवधनुष्य पेलणाऱ्या श्रीरामाचे सामर्थ्य काय होते याची कल्पना रावणालाही होती. अयोध्येहून सैन्य मागवून रावणावर चाल करूनही श्रीराम जाऊ शकले असते; मात्र त्यांनी तसे न करता वानरसेनेला संघटित करून त्यांची मने जिंकली आणि असुरी शक्तीविरोधात लढण्यासाठी मोठी फौज सिद्ध केली. वालीचा वध करून सुग्रीवाला जवळ केले. यावरून श्रीरामांमधील संघटनकौशल्य लक्षात येते.

**६. एकपत्नीव्रत :** ज्या काळात राजे आणि राजपुत्र अनेक विवाह करत त्या काळातही प्रभू श्रीरामांनी एकपत्नीव्रत आचरले होते. वनवासाहून आल्यानंतर एका परिटाच्या संशयावरून श्रीरामांनी सीतेचा त्याग केला. पुढे अश्वमेध यज्ञाच्या प्रसंगी पत्नीची आवश्यकता असताना प्रभू श्रीरामांनी दुसरा विवाह न करता सीतामातेची प्रतिकृती बनवून ती पत्नी म्हणून सोबत बसवली. पत्नीप्रती त्यांची निष्ठा या एका उदाहरणावरून लक्षात येते.

**७. त्याग आणि साधेपणा :** सावत्र माता कैकयीच्या वचनाचा आदर ठेवून त्यांनी एका क्षणात साऱ्या राजसुखाचा त्याग करून वल्कले परिधान केली. वनवासात काट्याकुट्यातून अनवाणी चालले. झोपडीत राहून कंदमुळे खाल्ली, जमिनीवर झोपले. जंगलातील वानरांना आणि अस्वलांना त्यांनी प्रेमाने जवळ केले, शबरीची उष्टी बोरे खाल्ली. यातून श्रीरामांतील त्यागाची आणि साधेपणाची जाणीव प्रकर्षाने होते. हल्लीचे राजकारणी निवडणूका आल्या की छायाचित्रे काढण्यापुरते गरिबांच्या झोपड्यांत जाऊन जेवतात (हे जेवणही फाईव्हस्टार हॉटेलमधून मागवलेले असते) कुठे अंगीभूत साधेपणा असलेले प्रभू श्रीराम आणि कुठे साधेपणाचा आव आणणारी आताची राजकीय मंडळी. पुत्रवियोग सहन न झाल्याने राजा दशरथांनी प्राणत्याग केला. ही बातमी प्रभू रामचंद्रांना कळताच त्यांनी पितृवियोग न करता त्यांच्या पुढील गतीसाठी श्राद्धकर्म केले. यातून त्यांनी धार्मिक विधींचे महत्व अधोरेखित केले आहे. सीताहरण झाल्यानंतर सीतेच्या वियोगाने दुःखी झालेल्या श्रीरामांनी झाडांना कवटाळल्याचे संदर्भ आढळतात; मात्र भविष्याचेही ज्ञान असलेल्या श्रीरामांचा हा वियोग केवळ दाखवण्यापुरता होता. झाडांना मिठी मारून श्रीरामाने अनेक शापित जीवांना जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून कायमचे मुक्त केले. शबरीची भेट घेऊन आणि तिने दिलेली उष्टी बोरे खाऊन शबरीचाही उद्धार केला. अशी एक ना अनेक गुणवैशिष्ट्ये रामायणाच्या वाचनातून लक्षात येतात. यंदाच्या श्रीरामनवमीच्या पावनदिनी आपल्यातही श्रीरामांसारखे गुण यावेत यासाठी प्रभू श्रीरामांच्याच चरणी शरणागत होऊन प्रार्थना करूया !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## राम जन्म

प्रभुराम जन्म शुभ
ती नवमीशुध्द चैत्र
जन कल्याण साधे
तारांगणात हो मैत्र

आभाळ भारावले
सार्थ पुनर्वसू नक्षत्र
अयोध्या भाग्यवान
कळे सार्थकनाक्षत्र

रामावतरी भुई वरी
घटिका करे पवित्र
महोत्सव असे होई
जोड नाही अन्यत्र

घालून देई अध्याय
कसे राजाचे चरित्र
राम राज्य स्थापना
प्रजेला उर्जा जनित्र

सद्गुण सुगंधीपुष्पे
मल्लिका एक सूत्र
रामलल्ला जन्मला
निखळलीकाळरात्र

अयोध्या मंदिर बांधे
मूर्ती स्थापली पवित्र
स्वप्न आले प्रत्यक्षात
रामकथा उभे सचित्र

मूर्त सोज्वळ निर्मळ
जगाचे खिळले नेत्र
रामलल्ला उत्सवार्थ
सजले आयोध्याक्षेत्र

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक ... बातमी

# सत्ताकारणाचा 'सातारा' पॅटर्न...




राजकारण हे समाजसेवेचे पवित्र माध्यम आहे ही संकल्पना कधीच कालबाह्य झाले आहे राजकारण करायचे असते ते केवळ पैसा, संपत्ती, सत्ता मिळवण्यासाठीच मग त्यासाठी प्रेमात आणि युद्धात काहीही केलेले क्षम्य असते तसेच आजकालच्या काळात सत्तेसाठी वाट्टेल ते केलेले चालते नव्हे ती आजची अपरिहार्यता बनली आहे. सत्ता मिळवण्यासाठी नैतिकता नितिमुल्ये, चरित्र कि, राजनिती, पक्षनिष्ठा, विचारधारा या सगळ्या गोष्टी गैरलागू ठरतात आणि ऐन केन प्रकाराने सत्ता हेच सगळे राजकीय पक्ष, नेते यांचे ऐकमेव ध्येय बनले आहे, कोण कोणाचा मित्र आणि शत्रु आहे हेच कळेनासे झाले आहे. गेल्या काही वर्षांपासून तर राजकारण सत्ताकारणाचे संदर्भच बदलुन गेले आहेत.

सत्ताधारी पक्षाकडून यंत्रणांचा गैरवापर करून पक्षांतर केले जात आहे आणि सत्ता मिळवली जात आहे हे अनेकदा अधोरेखित होत आले आहे. चरित्र कि राजनिती व्हावी यासाठी पक्षांतर बंदी कायदा आणला गेला तो अधिक कडक केला गेला मात्र आमच्या राजकारण्यांनी पक्षांतर बंदी कायद्याची ऐशीतैशी करुन टाकली आहे आणि पक्षांतर बंदी कायदा केवळ कागदावरच नकली वाघ बनून राहिला आहे. शेवटची आशा म्हणून न्यायव्यवस्थेकडे जनता मोठ्या अपेक्षेने पहाते मात्र २०२२ साली ज्या पद्धतीने राज्यात सत्तांतर झाले आणि न्यायव्यवस्थेने ज्या पद्धतीने कालापव्यय चालवला आहे ते पहाता लोकशाही बाबत न्यायव्यवस्था देखील फारशी गंभीर दिसत नाही. या सगळ्यांत लोकशाहीचे मात्र धिंडवडे निघत आहेत आणि लोकशाहीच्या नावाखाली हुकुमशाही, एकाधिकारशाही चालली आहे.

जो पर्यंत एखादा विरोधी पक्षात असतो तो पर्यंत तो पापी, भ्रष्टाचारी असतो मात्र आपणच आरोप करणाऱ्यांना आपल्या पक्षात घेऊन पवित्र करण्याचा पायंडा गेल्या काही वर्षांपासून पडला आहे. एखादा आपल्या पक्षात सहजासहजी येत नसेल तर ईडी सिबीआय आयटी सारख्या यंत्रणाचा वापर केला जातो आणि आपल्या पक्षात पवित्र करुन घेतले जाते. २०२२ साली शिंदे आणि त्यांच्या चाळीस सहकाऱ्यांनी अशाच पद्धतीने पक्ष सोडला आणि महाशक्तींच्या आशिर्वादाने मुख्यमंत्री पद मिळवल मामात्र ते औटघटकेचे ठरले. २०२३ मधे देखील अशाच पद्धतीने राष्ट्रवादी काँग्रेस फोडली गेली. विशेष म्हणजे हेच शिंदे फडणवीस यांच्या सरकार मधे असतांना मला मंत्रीमंडळात काम करता येत नाही असे म्हणत त्यांच्या सह शिवसेनेचे अनेक मंत्री राजीनामा खिशात घेऊन सत्ता ऊपभोगत होते मात्र शेवट पर्यंत राजीनामे दिले नाहीत.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांची महायुती असली तरी भाजपचे ध्येय आहे ते शत प्रतिशत चे. त्या दृष्टीने पक्षाची सुनियोजित वाटचाल देखील सुरू आहे, योग्य वेळ आली की भाजप केवळ विरोध पक्षांचाच नव्हे तर मित्र पक्षांचा देखील करेक्ट कार्यक्रम करतो हा इतिहास आहे. अर्थात आपला पक्ष शतप्रतिशत व्हावा यासाठी भाजप एक राजकीय पक्ष म्हणून महत्त्वाकांक्षा बाळगत असेल तर त्या गैर काहीच नाही. प्रत्येक पक्ष आपपले हित साधणारच. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत तिकिट वाटपात आपल्या पक्षाचे ऊमेदवार भाजपने शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस कडुन ऊभे केले नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अपेक्षित निकाल लागले भाजप नंबर वन ठरला.

मात्र अगोदर बदलापूर, सोलापूर नंतर सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीत भाजपने शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा करेक्ट कार्यक्रम केला. सातारा जिल्हा परिषदेत दोघांचे बहुमत असतांना भाजपने त्यांना कात्रजचा घाट दाखवला. याला सक्रिय साथ मिळाली ती शिंदे सेनेचे आमदार महेश शिंदे आणि पोलिस प्रशासनाची. आजवर निवडणूक आयोग भाजपसाठी झटत होते आता पोलिस दल देखील मैदानात ऊतरत आहे. पोलिसांनी वाई च्या शिंदे यांच्या अपहरणाचा गुन्हा दाखल केला आणि जिथे मतदान होणार होते त्याच्या दारावरच दोन नगरसेवकांना अटक केली आणि मतदाना पासुन रोखले. नंतर ज्यांच्या अपहरणाचा गुन्हा दाखल झाला केला तेच माझे अपहरण झाले नव्हते असा जबाब देतात मग पोलिसांनी खोटा गुन्हा कोणत्या ऊद्देशाने दाखल केला. यावरुन भाजप शिवसेना यांच्यात चांगलीच जुंपली, वाद विधिमंडळात पोहचला तेथे देखील पिठासीन अधिकारी पक्षीय भुमिका घेतांना दिसले. ऊपसभापती निलम गोर्हे यांनी पोलीस अधिक्षकांच्या निलंबनाचा आदेश सभापती राम शिंदे यांनी स्थगित ठेवला. पिठासीन पदाचे राजकियीकरण झाले आहे का? पोलिस दलाचे देखील राजकियीकरण झाले आहे का?. राज्यमंत्री शंभुराजे देसाई यांना पोलीस प्रसाद मिळाला. या सगळ्यांवरून लोकशाहीचा खुन झाला असल्याचे आरोप प्रत्यारोप ऐकमेकांवर केले जात आहे. सत्तेचे लोणी खाणाऱ्या बोक्याचे भांडणे अशा पद्धतीने चव्हाटय़ावर येत आहे. शिंदे सेनेची अवस्था 'सांगताही येईना- सहनही होईना. तुझं माझ जमेना तुझ्या वाचून करमेना अशी परिस्थिती अवस्था मित्र पक्षांची झाली आहे. शेवटी जनतेला मात्र यात काडीचाही रस नाही.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# न.मुं.म.पा. मालमत्ता कराच्या बिलावर जुईपाडा गावाचे नाव गायब; नागरिकांत संभ्रम



**अक्षराज : विनोद धुरंध**

**रदि.२५, जुईनगर (नवी मुंबई) :** न.मुं.म.पा. मालमत्ता कराच्या बिलांमध्ये जुईपाडा गावाचे नावच छापून येत नसल्याची गंभीर बाब समोर आली असून, याबाबत जुईनगरच्या माजी नगरसेविका तनुजा श्रीधर मढवी यांनी महापौर सुजाता पाटील यांच्याकडे तक्रार नोंदवली आहे. न.मुं.म.पा.च्या नवीन प्रभाग क्रमांक २२ अंतर्गत येणाऱ्या जुईपाडा गावातील मालमत्ताधारकांना मिळणाऱ्या कराच्या बिलांवर गावाचे नाव नसल्यामुळे संबंधित बिलाचा वास्तव्याचा पुरावा म्हणून उपयोग करता येत नाही. तसेच, अशा अपूर्ण पत्त्यामुळे इतरत्र सादर करताना नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय, काही बिलांमध्ये घर क्रमांकाऐवजी प्लॉट क्रमांक छापून येत असून, सेक्टर २३ ऐवजी (डशलींॲ-डक्ख) असा चुकीचा उल्लेख करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, पालिकेच्या पाणी बिलांवर मात्र संपूर्ण व अचूक पत्ता छापलेला दिसतो, मात्र मालमत्ता कराच्या बिलांमध्येच या त्रुटी आढळत आहेत.माजी नगरसेविका तनुजा मढवी यांनी ही बाब गांभीर्याने घेत महापौर सुजाता पाटील यांना पुराव्यांसह लेखी निवेदन सादर केले आहे. त्यांनी पत्रात नमूद केल्याप्रमाणे, अपूर्ण पत्त्यामुळे संबंधित मालमत्तेचे अचूक स्थान ओळखणे कठीण होते.ज्यामुळे प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. यापूर्वीही तनुजा मढवी यांनी प्रशासनाशी पाठपुरावा करून मालमत्ता कराच्या बिलांवर प्रथम असेसमेंटची तारीख व क्षेत्रफळ यांची माहिती छापण्यास भाग पाडले होते. त्याचप्रमाणे, आता पत्त्याच्या त्रुटी दूर केल्यास जुईपाडा येथील नागरिकांना योग्य व संपूर्ण माहिती असलेली बिले मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सदर निवेदन समाजसेवक श्रीधर मढवी यांनी महापौरांकडे सादर केले आहे.

## २०३५ पर्यंत एसटी ताफा पूर्णपणे इलेक्ट्रिक करणार - परिवहन मंत्री सरनाईक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, मुंबई :** राज्याच्या पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, 'महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५' अंतर्गत २०३५ पर्यंत राज्य परिवहन (एसटी) महामंडळाचा संपूर्ण बस ताफा इलेक्ट्रिक करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय शासनाने घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत दिली. नियम २६० अंतर्गत मांडलेल्या प्रस्तावावर बोलताना मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, वाढते वायूप्रदूषण, इंधन दरातील चढ-उतार आणि जागतिक हवामान बदल यांचा विचार करता इलेक्ट्रिक वाहनांचा वापर ही काळाची गरज ठरली आहे. सुमारे १४ हजार बसचा ताफा असलेली एसटी ही ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी असून, या सेवेचे रूपांतर हरित ऊर्जेवर करण्याचा शासनाचा विचार आहे. या धोरणाअंतर्गत नागरिकांना इलेक्ट्रिक वाहन खरेदीसाठी कर सवलती देण्यात येणार असून, टोल माफीमुळे प्रवास खर्चात बचत होणार आहे. तसेच राज्य व राष्ट्रीय महामार्गांवर दर २५ किलोमीटर अंतरावर चार्जिंग सुविधा उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. चार्जिंग पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन देण्यात येणार असून, संशोधन, नवकल्पना आणि कौशल्य विकासाला चालना दिली जाणार आहे.

चार्जिंग स्टेशनसाठी सौर ऊर्जेचा वापर करण्यावर विशेष भर देण्यात येणार असून, ऊर्जा निर्मितीपासून वापरापर्यंत संपूर्ण प्रक्रिया पर्यावरणपूरक करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले. या निर्णयामुळे पर्यावरण संवर्धनाला चालना मिळण्याबरोबरच एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थितीतही सुधारणा होईल. हरित ऊर्जेमुळे इंधन व देखभाल खर्चात बचत होऊन दीर्घकालीन टिकाऊपणा साध्य होणार आहे. तसेच ई-मोबिलिटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन महाराष्ट्र देशात अग्रस्थानी राहील, असा विश्वासही मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

## पोलीसांना मालकी हक्काची घरे देण्याबाबत सकारात्मक भूमिका - गृहराज्यमंत्री

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, मुंबई :** राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देण्याच्या मागणीबाबत सरकार सकारात्मक असून यासाठी विविध स्तरांवर नियोजन सुरू असल्याची माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत दिली.

पोलीस गृहनिर्माण महामंडळामार्फत पोलीसांना मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देण्यासंदर्भात सदस्य आदित्य ठाकरे यांनी अर्धातास चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेला गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी उत्तर दिले. या चर्चेत सदस्य अमिन पटेल, सुनील जामसूतकर यांनीही सहभाग घेतला.

कदम म्हणाले की, पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून, विशेषतः मुंबईत सुमारे ४० हजार घरे उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे २० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी सुमारे ६ हजार कोटी रुपये शासन देणार असून उर्वरित निधी कर्जाच्या स्वरूपात उभारला जाणार आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या पोलीस वसाहतींचा पुनर्विकास करण्यावरही भर देण्यात येणार आहे. यासाठी 'पोलीस हाऊसिंग टाउनशिप' ही संकल्पना राबविण्यात येत असून, ३० जानेवारी २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या टाउनशिपमध्ये केवळ घरे नव्हे, तर शाळा, रुग्णालये आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे.

पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांकडूनही विविध मागण्या येत असून त्यांच्याशी बैठका घेऊन सूचना विचारात घेतल्या जात आहेत. नवीन भरती होणाऱ्या कर्मचाऱ्यांना घरांची गरज लक्षात घेऊन काही ठिकाणी जुनी घरे रिकामी करण्यासाठी दंड वाढविण्यात आला होता. मात्र या निर्णयाचा प्रत्यक्ष परिणाम काय झाला, याचा आढावा घेतला जात असून त्यानुसार पुढील निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

मालकी हक्काची घरे देण्याबाबत राज्य सरकारने स्वतंत्र समिती नेमली असून, १ जानेवारी २०२६ पासून ही समिती कार्यरत आहे. या समितीकडून आर्थिक परिणाम, धोरणात्मक बाबी आणि सर्व विभागांवरील परिणाम यांचा अभ्यास केला जात आहे. पोलीस कर्मचाऱ्यांसाठी विशेष योजना राबविण्याचाही पर्याय विचाराधीन असल्याचे कदम यांनी नमूद केले.

याशिवाय म्हाडा यांच्या सहकार्यानेही घरे उभारण्याचे पर्याय तपासले जात आहेत. खासगी विकासकांशिवाय प्रकल्प राबविण्याचे मॉडेलही समोर आले असून त्यावर चर्चा सुरू आहे. पोलीस कर्मचाऱ्यांना सन्मानाने राहता येईल, अशी घरे उपलब्ध करून देण्यासाठी सरकार कटिबद्ध असून, लवकरच ठोस निर्णय घेतला जाईल, असे कदम यांनी स्पष्ट केले.

# कांद्याच्या प्रश्नावर संसदेत खासदार निलेश लंके यांचे आंदोलन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, अहिल्यानगर :** देशातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी खासदार निलेश लंके यांनी दिनांक २४ मार्च २०२६ रोजी संसद भवन परिसरात जोरदार आंदोलन केले. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य दर मिळावा, वाढत्या खर्चावर नियंत्रण यावे आणि कांदा बाजारपेठेला स्थैर्य मिळावे. या उद्देशाने हे आंदोलन करण्यात आले.

सध्या कांदा उत्पादक शेतकरी वाढत्या उत्पादन खर्चामुळे आणि बाजारातील अस्थिर दरांमुळे मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जात आहेत. त्यातच केंद्र सरकारच्या बदलत्या निर्यात




धोरणामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार लंके यांनी संसद परिसरात आंदोलन करत केंद्र सरकारसमोर विविध मागण्या मांडल्या.

आंदोलना दरम्यान करण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव लागू करावा, दर्जेदार बियाणे स्वस्त दरात उपलब्ध करून द्यावेत, बियाण्यांच्या किंमतींवर नियंत्रण आणावे, कांद्यावरील निर्यात बंदी हटवून निर्यात पूर्णपणे मुक्त करावी, कांद्याची निर्यात वाढीसाठी ठोस धोरण आखावे, नाफ ेड व एनसीसीएफमार्फत झालेल्या कांदा खरेदी प्रक्रियेची सीबीआयमार्फत चौकशी करावी यांचा समावेश आहे.

यावेळी बोलताना खासदार निलेश लंके यांनी सांगितले की, देशातील लाखो कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यांच्या घामाचे योग्य मोल मिळवून देण्यासाठी हा लढा उभारला आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत हा संघर्ष सुरूच राहील. या आंदोलनात खासदार भास्कर भगरे, खा.बजरंग सोनवणे, खा. शोभा बच्छाव व खासदार धैर्यशील मोहिते यांच्यासह अनेक खासदारांनी सहभाग घेत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एकजूट दर्शवली. संसद भवन परिसरात झालेल्या या आंदोलनामुळे देशभरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा आवाज अधिक तीव्र झाला आहे.

# कांदा उत्पादकांसाठी ठाम लढा; आ.दातेंची कांदा अनुदानाची जोरदार मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आज विधान भवन, मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी शेतकऱ्यांच्या हिताचा मुद्दा ठामपणे मांडत कांद्याला अनुदान देण्याची जोरदार मागणी केली.

उपमुख्यमंत्री श्रीम.सुनेत्राताई पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील आमदार तसेच कृषी, पणन व वित्त विभागाचे प्रधान सचिव या बैठकीस उपस्थित होते.

पारनेर मतदारसंघासह राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी गेल्या काही महिन्यांपासून अत्यंत कमी बाजारभावामुळे आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी विविध आंदोलनाद्वारे आपल्या हक्कासाठी आवाज उठवला आहे. या सर्व आंदोलनांची दखल घेत आणि शेतकरी हिताला प्राधान्य देत आमदार काशिनाथ दाते यांनी बैठकीत ठाम भूमिका मांडली. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी, पणन व वित्त विभागाच्या प्रधान सचिवांची अभ्यास समिती स्थापन करून आठ दिवसांत



> कांद्याला किमान ५ रुपये प्रति किलो अनुदान देऊन शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, शेतकऱ्यांच्या वाढत्या उत्पादनखर्चाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत आवश्यक आहे, मुंबई विधानभवनात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री सकारात्मक विचार करुन शेतकरी हिताचे निर्णय होईल.
> **- आ.काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य तो निर्णय घेऊन अनुदान मंजूर करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

# माथेरान ई रिक्षेचा प्रश्न चिघळला

## दोन जणांची प्रकृती चिंताजनक; तिसऱ्या दिवशी उपोषण मागे




**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२५, माथेरान :** सुप्रीम कोर्टाने ०६ ऑगस्ट २०२५ रोजी रिक्षाचालकांच्या पुनर्वसनाबाबत स्पष्ट आदेश दिले असताना ही, संबंधित मॉनिटरिंग कमिटीने अद्याप ठोस निर्णय न घेतल्यामुळे माथेरानमधील ई-रिक्षा प्रश्न गंभीर बनला आहे. वारंवार आंदोलने आणि संप करूनही केवळ आश्वासनांवर आंदोलने मागे घेण्यास भाग पाडले गेल्याने अखेर ई-रिक्षा संघटनेने उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. या उपोषणाला माथेरान मधून सर्व स्थरातून पाठिंबा मिळत आहे,आज उपोषणाचा तिसरा दिवस असून, आंदोलनकर्त्यांची प्रकृती खालावत चालली आहे. उपोषणात सहभागी असलेले अतिश सावंत, केतन रामाने, दिनेश सुतार आणि उज्वला राणे यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापैकी दोन जणांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, माथेरान येथील संपूर्ण जनजीवन सध्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशांवर आणि मॉनिटरिंग कमिटीच्या निर्णयांवर अवलंबून झाले आहे.

मात्र, वारंवार होणारा हस्तक्षेप आणि निर्णय प्रक्रियेत होणारा विलंब यामुळे माथेरानकरांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. ई-रिक्षा संदर्भातील ७४ परवान्यांबाबत कोणताही ठोस निर्णय किंवा स्पष्ट भूमिका मॉनिटरिंग कमिटीकडून अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे स्थानिक प्रशासन, नगरसेवक, प्रांत कार्यालय, जिल्हाधिकारी, आमदार आणि खासदार यांच्याही हातात काहीच उरलेले नाही, अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.दरम्यान, उपोषण सुरू असताना प्रशासनातील माथेरान तहसील सुरेंद्र सिंह ठाकूर, मुख्याधिकारी राहुल इंगळे, नगराध्यक्ष चंद्रकांत यांनी भेट घेऊन वेळ मागून घेतली परंतु ही रिक्षा संघटना आपल्या निर्णयावर ठाम असल्याकारणाने उपोषण माग न घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला. स्थानिक पातळीवर अधिकारी वर्गांचा कोणताही निर्णय उपोषण मागे घेण्यात अपयशी ठरत असताना निर्यायक एकही वरिष्ठ अधिकारी आंदोलनकर्त्यांची

> आम्ही वनट्री हील येथे राहतो. दैनंदिन कामानिमित्त आम्हाला दररोज बाजारात यावे लागते. आजारी पेशंट किंवा घरातील कार्यक्रम असल्यास तीन-तीन, चार-चार किलोमीटर चालत प्रवास करताना भरपूर थकायला होते. मानसिक त्रास सहन करावा लागतो, जेव्हा पासून इ रिक्षा सुरू झाली आहे त्या वेळेपासून आम्हाला मोठा दिलासा मिळाला आहे, तरी मॉनिटरिंग कमिटीने इ रिक्षा संघटनेची जी मागणी आहे. त्या मागण्या मान्य कराव्यात जेणेकरून त्यांच्याबरोबर संपूर्ण माथेरानकरांना इ रिक्षाचीआवश्यकता आहे.
> **- मनोहर चाळके (स्थानिक रहिवासी)**
>
> ---
>
> रिक्षाचा संघटनेचा बेमुदत उपोषण अत्यंत दुर्दैवी आहे. रिक्षा संघटनेची जी मागणी आहे. ही रास्त आहे. मॉनिटरिंग कमिटीने त्यांची मागणी त्वरित मान्य करावी. कारण इ रिक्षा आता माथेरानसाठी एक अविभाज्य घटक ठरला आहे प्रवास सुखकर होताना दिसत आहे.
> **- नितीन शहा (व्यापारी)**

भेट घेण्यासाठी पुढे आला नसल्याने संताप अधिक वाढला आहे.

सध्या उन्हाचा तडाका जोर वाढला आहे. सध्या पुरुषों महिला दोघेही उपोषणाला बसलेले आहेत आजचा उपोषण चा तिसरा दिवस आहे. आज दिवसभरात निर्णय होणे अपेक्षित आहे कारण उद्याची सुट्टी परवा शुक्रवार आणि परत शनिवार, रविवार सुट्टी जर उपोषण असंच पुढे राहिलं तर उपोषण उपोषणकर्त्यांची हालत खूप कठीण होऊन जाईल आणि उपोषण चिगळेलच माथेरान ही चिघळले आणि त्याचा परिणाम माथेरान वर नक्कीच होईल मॉनिटरिंग कमिटीला उपोषणकर्त्यांचा बळी पाहिजे आहे का? असा तीव्र सवाल आता स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने तातडीने मध्यस्थी करून या प्रश्नात हस्तक्षेप करावा आणि ई-रिक्षा चालकांना न्याय द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे. उपोषणकर्त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत असताना प्रशासन आणि संबंधित यंत्रणा जागी होणार का, याकडे संपूर्ण माथेरानचे लक्ष लागले आहे. प्रांत अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर हात रिक्षा चालकांचे बेमुदत उपोषण मागे घेण्यात आले. उप विभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी ई-रिक्षा पुनर्वसनासाठी लवकरच उपसमितीची बैठक व सनियंत्रण समितीची सभा घेण्याचे आश्वासन दिले.

यानंतर दिनेश सुतार यांच्यासह २१ चालकांनी उपोषण मागे घेतले. नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या प्रयत्नांना यश आले. तसेच आमदार महेंद्र थोरवे यांनीही अधिकाऱ्यांना तोडगा काढण्याच्या सूचना केल्या होत्या.

# श्री पंचमुखी हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व पंचकुंडात्मक रुद्रयाग सोहळ्याचे आयोजन

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२५, सोयगाव छ.संभाजीनगर) :** सोयगाव शहर व पंचक्रोशीत प्रथमच श्री पंचमुखी हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होत असून या सोहळ्यात दि.२४ मार्च २०२६ रोजी मूर्तीची



नगर प्रदक्षिणा व शोभयात्रा तसेच सायंकाळी ४ वाजता गोपूजन करण्यात येऊन रात्री ९ वाजता श्री.ह.भ.प विक्रम महाराज झालटे (मुक्ताईनगर) यांच्या कीर्तनचा कार्यक्रम झाला. दि.२५ मार्च २०२६ रोजी होम हवन ला प्रारंभ झाला असून दि.२५ मार्च २०२६ ला श्री.ह.भ.प अजब महाराज मिरगे (आसाडी) यांचे कीर्तन झाले. आज दि.२६ मार्च २०२६ ला श्री.ह.भ.प लखन महाराज पाटील (चिंचखेडा) यांचे कीर्तन असून दि.२७ मार्च २०२६ रोजी श्री पंचमुखी हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा कलषारोहन बलिदान पूर्णहुती आरती व महाप्रसादाचा कार्यक्रम असून या सोहळ्याचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक तर्फे करण्यात आले आहे.

# ढवळपुरीत दत्त मूर्ती स्थापनेनिमित्त रंगली मिरवणूक; महाप्रसाद व विद्युत रोषणाईने उत्सवाची सांगता

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील ढवळपुरी येथील दत्तमळा (रानमळा) येथे श्री गुरुदेव दत्त मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापणेनिमित्त भव्य व उत्साहपूर्ण वातावरणात मिरवणूक काढण्यात आली. या सोहळ्यामुळे रानमळा, दत्त मळा परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला होता. रानमळा येथून निघालेल्या मिरवणुकीच्या स्वागतासाठी ग्रामस्थांनी घराघरासमोर सडा-रांगोळी काढून दत्त गुरुंच्या आगमनाचे स्वागत केले.



दत्त मूर्ती राजस्थान येथे तयार करून विधीपूर्वक आणण्यात आली. त्यानंतर मूर्ती रानमळा येथे आणण्यात आली. दत्त मुर्तीचे सुहासिनी महिलांच्या हस्ते मूर्तीची पूजा करण्यात आली. सजवलेल्या ट्रॅक्टरच्या रथात दत्त मूर्ती विराजमान करून वाजत-गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून आला. महिलांनी फुगड्या खेळत श्री गुरुदेव दत्त च्या जयघोषात आनंद व्यक्त केला. यावेळी रानमळा दत्तमळा परिसरातील भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मिरवणूक वाजत-गाजत दत्त मळा येथील दत्त मंदिरात पोहोचले. तेथे धान्य निवास अर्पण करून दुसऱ्या दिवशी हभप. जनार्दन महाराज मुंढे (पिंपळगाव रोठा) व नाशिक येथील पुरोहितांच्या हस्ते दत्त मुर्ती व कलशाची विधिवत पूजा व आरती करून मूर्तीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर पंचक्रोशीतून आलेल्या भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने मंदिराची आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली असून संपूर्ण मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आल्याने परिसर भक्तिमय वातावरणाने फुलला होता. श्री.दत्त गुरूंच्या कृपेने गावात सुख, शांती व समृद्धी नांदो, अशी प्रार्थना करण्यात आली.

# हॉटेल्स आणि उद्योग यांचा गॅस पुरवठा वाढणार

## व्यावसायिक एलपीजीच्या कोट्यात ५० टक्क्यांपर्यंत वाढ; हॉटेल आणि उद्योगांना मोठा दिलासा



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, ठाणे :** देशातील व्यावसायिक एलपीजी (LPG) गॅसच्या पुरवठ्याबाबत केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, राज्यांना दिल्या जाणाऱ्या एकूण कोट्यात आता ५० टक्क्यांपर्यंत मोठी वाढ करण्यात आली आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्राद्वारे या निर्णयाची माहिती दिली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी राज्य शासनाच्या सूचनेनुसार करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

या नव्या धोरणानुसार, राज्यांना यापूर्वी मिळणाऱ्या २० टक्के आणि त्यानंतर सुधारणांच्या आधारे वाढविण्यात आलेल्या १० टक्के कोट्याव्यतिरिक्त आता अतिरिक्त २० टक्के कोटा मंजूर करण्यात आला आहे. यामुळे व्यावसायिक एलपीजीचा एकूण पुरवठा आता संकटपूर्व काळातील पातळीच्या ५० टक्क्यांवर पोहोचला आहे. या वाढीव कोट्याचा सर्वाधिक फायदा रेस्टॉरंट्स, ढाबे, हॉटेल्स, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया उद्योग, दुग्धशाळा आणि सरकारी अनुदानित अन्न केंद्रांना होणार आहे. तसेच स्थलांतरित मजुरांसाठी उपलब्ध असलेल्या ५ किलोच्या एफटीएल (FTL) सिलिंडर पुरवठ्यालाही यात प्राधान्य देण्यात आले आहे.या सुविधेचा लाभ घेण्यासाठी सरकारने काही अटीही लागू केल्या आहेत. सर्व व्यावसायिक आणि औद्योगिक एलपीजी ग्राहकांना संबंधित तेल कंपन्यांकडे (OMCs) आपली अधिकृत नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या कंपन्या ग्राहकांच्या वार्षिक वापराचा आणि त्यांच्या क्षेत्राचा संपूर्ण रेकॉर्ड ठेवणार आहेत, जेणेकरून गॅसचा गैरवापर टाळता येईल. यासोबतच, ज्या भागात पाईप गॅसची (PNG) सुविधा उपलब्ध आहे, तिथे ग्राहकांनी पीएनजीसाठी अर्ज करणे आणि त्या वापरासाठीची तयारी दर्शविणे आवश्यक आहे. या निर्णयामुळे व्यावसायिक क्षेत्रातील इंधन टंचाई दूर होण्यास मदत होणार असून उद्योगांना मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास शासनाने व्यक्त केला आहे.

# चंद्रपूरच्या विकासाला नवी दिशा देण्यासाठी टायगर सफारी प्रकल्पाला गती द्या - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** चंद्रपूरच्या मूल रोडवरील वन अकादमी जवळील ५०० एकर क्षेत्रात प्रस्तावित असलेल्या टायगर सफारी प्रकल्पाला गती देण्याची मागणी आज अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना आ. किशोर जोरगेवार यांनी केली. यावर उत्तर देताना केंद्राकडे पाठपुरावा सुरू असून लवकरच या प्रकल्पाला मान्यता मिळणार असल्याचे उत्तर वनमंत्री गणेश नाईक यांनी सभागृहाला दिले. चंद्रपूर टायगर सफारी आणि रेस्क्यू सेंटरसाठी आमदार किशोर जोरगेवार यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. त्यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा विषय मांडला होता. वनमंत्री नाईक यांनीही प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद देत निधी वितरण प्रक्रिया गतीमान करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानंतर आ. जोरगेवार यांनी नागपूर येथील गोरेवाडा प्राणी संग्रहालयाची पाहणी करून प्रकल्पाच्या आराखड्याची माहिती घेतली होती.

दिल्ली येथील केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या कार्यालयातही या संदर्भात बैठक पार पडली होती. या बैठकीला भारत सरकारचे सदस्य सचिव डॉ. व्ही. क्लेमेंट बेन, महाराष्ट्र राज्य वन्यजीव प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रीनिवास रेड्डी, तसेच एफडीसीएम गोरेवाडा प्राणी संग्रहालय लिमिटेड, नागपूरचे सीईओ चंद्रशेखर बाला उपस्थित होते. चंद्रपूरच्या वन अकादमीजवळ उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पासाठी सुमारे ६०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. एफडीसीएम गोरेवाडा झू लिमिटेड या संस्थेकडे प्रकल्पाचा सविस्तर आराखडा तयार करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या प्रकल्पात ऑस्ट्रेलियन, साऊथ अमेरिकन, साऊथ आफ्रिकन आणि इंडियन ट्रेल अशा विविध थीमवर आधारित प्राणी दर्शन झोन असतील. पर्यटकांना येथे कांगारू, जग्वार, माकडे, कॅपीबारा, विविध रंगीबेरंगी पक्षी तसेच देशी-विदेशी प्राणी पाहता येणार आहेत. याशिवाय ४४ हेक्टर क्षेत्रात वाहन सफारी, २० एकर क्षेत्रात चिल्ड्रन पार्क आणि पर्यटकांसाठी विविध सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

दरम्यान, आज अधिवेशनात बोलताना आ. किशोर जोरगेवार यांनी



पुन्हा हा विषय उपस्थित करत सभागृहाचे लक्ष वेधले. ते यावेळी म्हणाले की, चंद्रपूर हा वाघांचे संरक्षण करणारा जिल्हा आहे. हे आमच्यासाठी भूषणावह असले तरी त्याचे दुष्परिणामही आम्हाला भोगावे लागत आहेत.

दरवर्षी सुमारे ५० लोकांचे बळी वाघ घेत आहेत. त्यामुळे या नरभक्षी वाघांच्या रेस्क्यू साठी रेस्क्यू सेंटर आणि टायगर सफारी चंद्रपूरला मंजूर करण्यात आली आहे. प्राणी संग्रहालय प्राधिकरणाने त्याला मान्यताही दिली आहे. त्यामुळे या प्रकल्पाला गती देण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. यासोबतच वाघ आणि बिबट्यांना पकडण्यासाठी वापरण्यात येणारे पिंजरे जुन्या पद्धतीचे असून ते रिमोट ऑपरेटेड करण्यात यावेत, अशीही मागणी त्यांनी केली. यावर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी टायगर सफारीचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आला असल्याचे सांगितले व त्याचा पाठपुरावा सुरू असल्याचे स्पष्ट केले. लवकरच या प्रकल्पाला मान्यता मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच हिंसक प्राणी पकडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पिंजऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत ते रिमोट ऑपरेटेड करण्यात येणार असल्याचे ही त्यांनी सांगितले.

# चंद्रपूरच्या जीवन वाहिन्यांना नवसंजीवनी द्या; आ.मुनगंटीवार यांची ठाम मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरातील जीवनदायिनी इरई व झरपट या नद्यांचे तातडीने पुनरुज्जीवन करून त्या स्वच्छ व अविरत वाहत्या कराव्यात, अशी ठाम व आग्रही मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत अर्धा तास चर्चेदरम्यान मांडली. सनातन संस्कृतीचा वारसा लाभलेल्या भारतात पंचमहाभूतांना दैवत मानले जाते आणि नद्यांना 'माता' म्हणून पूजले जाते. मात्र आधुनिकतेच्या अतिरेकामुळे नद्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण झाले असून त्या प्रदूषणाच्या गंभीर विळख्यात अडकल्या आहेत. संस्कारित प्रगतीऐवजी स्वैराचार याकडे वाढणाऱ्या प्रवृत्तीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे, याकडे ही त्यांनी लक्ष वेधले.. सांस्कृतिक कार्यमंत्री पदाचा कार्यभार सांभाळत असताना दि. ३० सप्टेंबर २०२२ रोजी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त चला जाणूया नदीला हा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला होता. नद्यांना सजीव घटक मानून त्यांच्या स्वच्छता, संवर्धन व प्रदूषणमुक्तीसाठी जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमाला पर्यावरण विभागामार्फत अधिक व्यापक स्वरूप देण्यात यावे व हा उपक्रम पुढे न्यावा अशी मागणीही आमदार मुनगंटीवार यांनी यावेळी केली. चंद्रपूर शहरातील इरई नदी व झरपट नदी या नद्या शहराच्या जीवनवाहिनी मानल्या जातात. मात्र वाढते औद्योगिक सांडपाणी, अस्वच्छता व अतिक्रमणांमुळे या नद्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे.

दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून कॅन्सर व त्वचारोगांसारख्या गंभीर आजारांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे या नद्यांचे तातडीने पुनरुज्जीवन करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले. सध्या चैत्र महिन्यात माता महाकालीची यात्रा सुरू असून झरपट नदी त्याच परिसरात आहे. विशेषत: मराठवाडयातुन मोठया प्रमाणावर भाविक या यात्रेत सहभागी होतात असे सांगत या झरपट नदीचे धार्मिक महत्व त्यांनी अधोरेखित केले.

या नद्या पुनरुज्जीवीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध असलेल्या सुमारे ५००० कोटी रुपयांच्या निधीपैकी किमान २०० कोटी रुपये चंद्रपूरातील या दोन्ही नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी खर्च करण्यात यावेत, अशी ठोस मागणी आमदार मुनगंटीवार यांनी केली. तसेच दोन्ही नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी सविस्तर आराखडा तयार करणे, नदीपात्रातील अतिक्रमणे तात्काळ हटविणे, व्यापक जनजागृती अभियान राबविणे आणि योग्य सांडपाणी व्यवस्थापन व औद्योगिक प्रदूषणावर कठोर नियंत्रण ठेवणे,नदी काठ सुशोभीत करणे या उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशीही त्यांनी मागणी केली. या माध्यमातून दोन्ही नद्या स्वच्छ, अविरत आणि शुद्ध पाण्यासह वाहत्या ठेवण्याचा संकल्प पूर्ण करून चंद्रपूरकरांना मोठा दिलासा द्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. या चर्चेला उत्तर देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी राज्यात नदी पुनरुज्जीवनासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती दिली. नद्यांकडे झालेले दुर्लक्ष अक्षम्य असल्याची कबुली देत त्या प्रदूषणमुक्त व स्वच्छ करण्याची जबाबदारी शासनाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन झाल्यानंतर तयार होणाऱ्या पहिल्याच प्रस्तावात चंद्रपूर येथील इरई व झरपट नद्यांचा अग्रक्रमाने समावेश करण्यात येईल, असे ठोस आश्वासन त्यांनी दिले. तसेच सांस्कृतिक कार्य विभागाच्या चला जाणूया नदीला या उपक्रमाला पर्यावरण विभागामार्फत पुढे नेण्याबाबत ही सकारात्मक विचार करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. या आश्वासनामुळे चंद्रपूरच्या पर्यावरण संवर्धनासाठी नवी आशा निर्माण झाली असून नागरिकांना स्वच्छ व निरोगी भवितव्याचा दिलासा मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

# थोडक्यात

## पानेड ते फणसवाडी रस्त्यासाठी ०१ एप्रिल रोजी ग्रामस्थांचे आंदोलन

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२५, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील पानेड ते फणसवाडी या रस्त्याचे काम प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून मागील २ वर्षापासून सुरू असून अजूनही हा रस्ता पूर्ण होत नसल्याने येथील नागरिकांना याचा फार मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सदरचा रस्ता तात्काळ दुरुस्त करावा. या मागणीसाठी सत्यशोधक सर्वोदय संघटनेच्या वतीने ०१ एप्रिल २०२६ रोजी आंदोलन करणार असल्याचे निवेदन प्रांताधिकारी यांना देण्यात आले आहे. प्रधानमंत्री-मुख्यमंत्री सडक योजनेतील पानेड ते फणसवाडी रस्त्याचे काम ऑक्टोबर २०२५ पासून सुरु आहे.सदर रस्ता सिमेंट कॉक्रिटीकरणाचा असून सुमारे ९.५ किलोमीटर लांबीचा आहे.या रस्त्यासाठी १३ कोटी रुपये निधी पडला असून सदरच्या रस्त्याचे काम ठेकेदाराच्या माध्यमातून सुरू आहे. मात्र अजूनही र सिमेंट कॉंक्रीटचे काम अद्याप सुरू झालं नाही. त्यामुळे रस्त्यावर जागोजागी खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून सर्वसामान्य प्रवाशांना या खड्ड्यातून प्रवास करावा लागत असताना रस्त्यावरील धुळीमुळे डोळ्यांना त्रास, श्वसनाचा त्रास, वाहनाचे सारखे पंक्चर होणे यामुळे सातत्याने येथील नागरिकांचे कंबर दुखी, मान दुखी, पाठ दुखी कमरेला गॅप पडणे हे वारंवार प्रकार घडत असून येथे अपघात ही घडण्याची दाट शक्यता निर्माण होत असल्याने सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी. या मागणीसाठी सत्यशोधक सर्वोदय संघटनेच्या वतीने ०१ एप्रिल २०२६ रोजी पेण खोपोली रोड, हेटवणे कॉलनी येथे सुरक्षित रस्ता हक्क सत्याग्रह आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन प्रांताधिकारी यांना देण्यात आले आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते संदीप पाटील, सुरेश पाटील, पंढरी रूपकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## खापरखेडा औष्णिक वीज केंद्राला राष्ट्रीय ऊर्जा कार्यक्षमता पुरस्कार



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२५, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील खापरखेडा औष्णिक वीज केंद्राला कौन्सिल ऑफ एन्व्हायरो एक्सलन्स तर्फे देण्यात येणारा ५ वा राष्ट्रीय वीज-उत्पादन ऊर्जा कार्यक्षमता २०२६ पुरस्कार २३ मार्चला नवी दिल्ली येथे पार पडलेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार विशेषतः सार्वजनिक क्षेत्रातील सर्वोत्तम कार्यक्षम सयंत्र भारांक श्रेणीमध्ये देण्यात आला आहे. खापरखेडा वीज केंद्राने वीज उत्पादनात सातत्य व तांत्रिक कार्यक्षमता राखून देशातील ऊर्जा क्षेत्रात आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. नवी दिल्ली येथे आयोजित कार्यक्रमात खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या वतीने उपमुख्य अभियंता नितीन रोकडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. खापरखेडा औष्णिक वीज केंद्राला आतापर्यंत राज्य पातळीवर अनेक पुरस्कार आहेत. मात्र, आता राष्ट्रीय स्तरावर वीज केंद्राने आपली चमक दाखविल्यामूळे खापरखेडा परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे. या यशामुळे खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या कार्यक्षमतेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

## बुवासाहेब महाराज यात्रा कमिटी अध्यक्षपदी गेणूभाऊ तोडमल




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२५, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी तालुक्यातील राहुरी खुर्द येथील जागृत देवस्थान बुवासाहेब महाराज यात्रा कमेटीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ नागरिक गेणूभाऊ तोडमल यांची तर उपाध्यक्षपदी गणेश भांड व सागर शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली. विशेष म्हणजे गेणूभाऊ तोडमल हे गेल्या तब्बल ४२ वर्षांपासून अध्यक्ष म्हणून कार्यरत असून त्यांच्या अनुभवाचा लाभ समितीला होत आहे. तसेच खजिनदारपदी भाऊराव शेडगे यांची, तर सह खजिनदारपदी साहेबराव मोरे यांची निवड करण्यात आली. बुवासाहेब महाराज मंदिराच्या सभामंडपात आयोजित नियोजन बैठकीत ही निवड सर्वानुमते जाहीर करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक मारुती शेडगे होते. यावेळी साहेबराव मोरे यांनी मागील वर्षाच्या हिशोबाचे वाचन करून शिल्लक रकमेची माहिती ग्रामस्थां समोर सादर केली. त्यानंतर यात्रा कमिटी नवीन कार्यकारिणी निश्चित करण्यात आली. बैठकीत युवक वर्गाकडून जत्रेदरम्यान डीजे वाजवण्यास परवानगी मिळवून देण्याची मागणी करण्यात आली. यावर अध्यक्ष गेणूभाऊ तोडमल यांनी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देण्याचा आग्रह धरत सनई, ढोल-ताशा, झांज पथक व बॅन्ड पथक यांना प्रोत्साहन देण्याचे मत व्यक्त केले. तसेच डीजेसाठी आवश्यक पोलीस परवानगी मिळवून देण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्रास्ताविक डॉ.तनपुरे सह साखर कारखान्याचे माजी संचालक नंदकुमार डोळस यांनी केले, तर शेवटी आभार मानण्यात आले. अध्यक्ष गेणूभाऊ तोडमल यांनी जत्रा शांततेत आणि शिस्तीत पार पाडण्याचे आवाहन केले.

या बैठकीस ग्रामपंचायत सदस्य नरेंद्र शेटे, राम तोडमल, अमोल डोळस, तसेच ज्येष्ठ नागरिक साहेबराव धोत्रे, निसारभाई शेख, ज्ञानदेव तोडमल, भगवान बाबा पतसंस्थेचे चेअरमन दिलीपराव आघाव, पप्पू पाटोळे, उमाकांत घोरपडे, आकाश शेटे, सुनिल कुमावत, बाबासाहेब पोपळघट, गोरख ससाणे, प्रशांत डोळस, चेतन घोरपडे, यश गोल्हार, निखिल राऊत, बबलू पाटोळे, आशुतोष खाचणे, राजेंद्र खोजे, सुनिल तोडमल, एकनाथ माळी, दिलीप क्षीरसागर, प्रशांत चोपडे, मनोज गरड, संजय डोळस यांच्यासह पत्रकार भिमराज गुंड, अशोक मंडलिक आणि प्रमोद डफळ यांसह असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

## एकाच दिवशी न्यायालयाने सुनावले दोन शिक्षा व ६ लाखाचा दंड

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२५, उदगीर (लातूर) :** मौजे शहाजानी औराद तालुका निलंगा येथील राहुल ट्रेडिंग कंपनीचे मालक उत्तम कुमार नरसिंग राव सावरे यांनी उदगीर येथील आडत व्यापारी राधेश्याम जी नावंदर यांच्याकडून फेब्रुवारी २०१३ मध्ये क्रेडिट वर ज्वारी घेऊन जाऊन राधेश्याम नावंदर यांना २ लाख रुपये व एक लाख ८० हजार रुपयांचे दोन चेक दिले होते. सदरील चेक राधेश्याम नावंदर यांनी बँकेत वटवण्यासाठी लावले असता सदरील चेक बाऊन्स झाले. त्यामुळे राधेश्याम नावंदर यांनी उदगीर न्यायालयामध्ये चेक बाऊन्स चे केसेस दाखल केल्या होत्या. त्या केसेस मध्ये उदगीर येथील न्यायाधीश श्री झेंडे यांनी सर्व साक्षी पुरावा व युक्तिवाद ऐकून आरोपी उत्तमकुमार नरसिंगराव सावरे यांना प्रत्येक केसमध्ये ३ महिन्याची कारावासाची शिक्षा व ३ लाख रुपयाचा दंड ठोठावण्यात आला. सदर प्रकरणात फिर्यादी राधेश्याम नावंदर यांच्याकडून उदगीर येथील विधीज्ञ ॲड काळेगोरे (जैन) यांनी काम पाहिले तर त्यांना ॲड कलवले, रियाज पटेल, सुशील जाधव व मनोज काळे गोरे यांनी सहकार्य केले.